महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २६९ वा | दिनांक : २३/०८/२०२५ | वार : शनिवार

## महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई :** विकसित महाराष्ट्र २०४७ चे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विकासाच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवणे गरजेचे आहे. शक्ती संवादाच्या माध्यमातून महिला सुरक्षा आणि सक्षमीकरणाबाबत चर्चा आणि विचार मंथन होत असून, यावर सकारात्मक विचार करून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राष्ट्रीय महिला आयोग व महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय 'शक्ती संवाद' कार्यक्रमाचे हॉटेल ट्रायडंट येथे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असून, दोन दिवस शक्ती संवादाच्या माध्यमातून राज्यासह देशातील महिलांच्या विविध समस्या आणि त्यावर उपाय यासदंर्भात चिंतन — मंथन होणार आहे. या महत्वपूर्ण चर्चेचा सकारात्मक विचार करून धोरणात्मक निर्णय घेतले जातील. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत २०४७' च्या स्वप्नपूर्तीसाठी महिलांचा सामाजिक आणि आर्थिक प्रगतीत सहभाग आवश्यक आहे.

विकसित अर्थव्यवस्थेसाठी लैंगिक समानता महत्वाची आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून जातीभेद आणि लिंगभेद समाप्त करून व्यक्तीच्या रूपाने सर्वांना समान संधी आणि अधिकार प्राप्त करून दिले आहेत. महिलांचे शिक्षण, रोजगार हे केवळ अधिकार राहिले नसून आर्थिक परिवर्तनाच्या उपक्रमासाठी आवश्यक आहेत.

मुलींच्या सबलीकरण व संरक्षणासाठी सुरू केलेल्या 'बेटी बचाव — बेटी पढाओ' योजनेपासून महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी 'लखपती दीदी' पर्यंतच्या योजना यशस्वीरित्या राबविण्यात येत आहेत. एक करोड महिलांना 'लखपती दीदी' बनवणार असल्याचा विश्वास यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर म्हणाल्या की, देशभरात विविध राज्यातील महिला आयोग महिलांच्या संरक्षणासाठी कार्यरत आहे. सर्व राज्यांनी एकत्रितरित्या काम केल्यास अधिक चांगले परिणाम साधता येतील. महाराष्ट्रात उद्योग जास्त असल्याने प्रत्येक कार्यालयात पॉश ॲक्ट संदर्भात समिती कार्यरत असणे गरजेचे असून त्यासाठी प्रयत्न करणार आहे. स्थानिक समित्यांना एकत्र करून त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच, 'तेरे मेरे सपने' ही लग्नापूर्वी समुपदेशन करणारी केंद्रे राज्यांमध्ये वाढविण्यात येणार आहेत.

महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे म्हणाल्या की, भारतीय राज्यघटनेने महिलांच्या सन्मान व हक्कांच्या रक्षणासाठी केलेल्या विशेष तरतुदीनुसार राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. महिलांची सामाजिक स्थिती उंचावणे, हक्कांचे रक्षण करणे व अन्यायाविरुद्ध न्याय मिळवून देणे हा याचा उद्देश आहे. महिला आयोग आपल्या दारी, बालविवाह व विधवा प्रथांना आळा बसण्यासाठी अभियान राबविण्यात येते. महिलांच्या सुरक्षेसाठी हेल्पलाइन—१५५२०९ सुरू करण्यात आली आहे. मिशन ई-सुरक्षा, सखी वन-स्टॉप सेंटर, भरोसा सेल्स व प्रशिक्षण शिबिरे हे महत्त्वाचे उपक्रम आहेत. राष्ट्रीय स्तरावर पंचायत से संसद २.०, सायबर सुरक्षेसाठी डिजिटल शक्ती, हरियाणाची मोरी लाडो रेडिओ कार्यक्रम, दृष्टीहीन महिलांसाठी सवेरा, ॲनिमिया रोखण्यासाठी मिशन उत्कर्ष, इशान्य भारतात महिलांना उद्योगासाठी स्वावलंबिनी आणि खाद्यपदार्थ व्यवसायासाठी महाराष्ट्राचे फराळ सखी हे उपक्रम उल्लेखनीय आहेत. पश्चिम बंगालचे "अपराजिता विधेयक" व विविध राज्यांतील अभिनव उपक्रम राष्ट्रीय महिला आयोगांची भूमिका अधिक प्रभावी करतात. या कार्यक्रमाद्वारे पुढे येणाऱ्या नवविचारांचा महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी सकारात्मक विचार करण्यात येणार असल्याचे तटकरे यांनी सांगितले.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर म्हणाल्या की, राज्यातील महिला तस्करी संपूर्ण नष्ट करण्याच्या दृष्टीने राज्य महिला आयोग काम करीत आहे. आतापर्यंत विविध देशातून अनेक महिलांची सुटका करण्यात आली आहे. महिलांची सुरक्षा ही आमची जबाबदारी असल्याने गुन्हेगारांना आणि गुन्हेगारीला आळा बसण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत.

या कार्यक्रमास विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, आमदार चित्रा वाघ, मनीषा चौधरी, विद्या ठाकूर, सदस्य सचिव नंदिनी आवडे, यांच्यासह विविध राज्यातील महिला आयोगाच्या अध्यक्षा, सचिव, सदस्य उपस्थित होते. यावेळी पॉश कायद्यासंदर्भातील पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल वाजणार



**मुंबई :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दिवाळीनंतर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोग आणि प्रशासनाचे काम सुरू झाले आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, राज्य निवडणूक आयोग मुंबईसह अ, ब, आणि क वर्गातील महापालिकांची प्रभाग रचना २५ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करणार आहे.

या निवडणुकांच्या तयारीसाठी २२ ते २८ ऑगस्ट या कालावधीत प्रभाग रचनेवर हरकती आणि सूचना मागवण्यात येणार होत्या. मात्र, काही महापालिकांनी प्रभाग रचनेचे प्रस्ताव आयोगाकडे उशिरा पाठवल्यामुळे, आता प्रभाग रचना सोमवारी (२५ ऑगस्ट) प्रसिद्ध केली जाणार असल्याचे बोलले जात आहे.

प्रभाग रचना प्रसिद्ध झाल्यानंतर त्यावर हरकती आणि सूचना मागवून सुनावणी घेतली जाईल. त्यानंतर प्रभाग रचनेला अंतिम स्वरूप देऊन तो आराखडा नगरविकास विभागाकडे पाठवण्यात येईल. सध्या राज्यातील २९ महानगरपालिकांपैकी १० महापालिकांच्या प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाला मिळाल्या आहेत.

मुंबई, नागपूर, पुणे, ठाणे, नाशिक, पिंपरी-चिंचवड, छत्रपती संभाजीनगर, वसई-विरार, नवी मुंबई या महापालिकांचा समावेश आहे. गट 'ड' मधील महापालिकांच्या प्रभाग रचनाही लवकरच प्राप्त होत आहेत. निवडणूक आयोगाकडून यापैकी बहुतांश महापालिकांच्या प्रभाग रचना सोमवारी प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न केला जाईल. ड वर्गाच्या महापालिकांच्या प्रभाग रचना ३ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध होणार असून त्यानंतर हरकती मागवल्या जातील.

**२९ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर-** प्राप्त हरकती आणि सुचनांवर सुनावणी घेणे. सुनावणीनंतर हरकती आणि सूचनांवर शिफारशी विचारात घेऊन प्राधिकृत अधिकाऱ्यांनी प्रभाग रचना अंतिम करून नगर विकास विभागाला पाठवणे.

**२२ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर-** अंतिम केलेली प्रभाग रचना नगर विकास विभागाने राज्य निवडणूक आयोगाला सादर करणे. राज्य निवडणूक आयोग यांनी अंतिम प्रभाग रचनेला मान्यता देणे.

**३ ऑक्टोबर ते ६ ऑक्टोबर-** राज्य निवडणूक आयुक्त यांनी अंतिम प्रभाग रचना अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध करणे.

मनपा आयुक्त नवल किशोर राम यांनी जाहीर केली प्रभाग रचना. मनपा आयुक्तांनी प्रभाग रचना जाहीर करताना "पुणे महानगरपालिका निवडणूक २०२५" असा उल्लेख केला. ४ नगरसेवकांचे ४० प्रभाग (मतदार संख्या ८४००० मतदार.) ५ नगरसेवकांचे १ प्रभाग (मतदारसंख्या १०५००) अशी रचना असेल. प्रभाग क्रमांक ३८ हा ५ सदस्यांचा असेल. नागरिकांना हरकती घेण्यासाठी ३ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ३ पर्यंत मुदत राहिल.

## बीडमध्ये वकिलाची कोर्टात आत्महत्या:सुसाईड नोटवरून न्यायाधीशावर गुन्हा

**बीड :** बीड जिल्ह्यातील एका सरकारी वकिलाने कोर्टात केलेल्या आत्महत्येविषयी एक नवी अपडेट समोर आली आहे. या प्रकरणी वडवणी न्यायालयाच्या न्यायाधीशावरच गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे राहण्याचे फर्मान सोडणाऱ्या न्यायाधीशावरच या प्रकरणी आरोपीच्या पिंजऱ्यात उभे राहण्याची वेळ आल्यामुळे राज्याच्या न्याय वर्तुळात एकच खळबळ माजली आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, वडवणी न्यायालयातील सरकारी वकील विनायक चंदेल यांनी दोन दिवसांपूर्वी न्यायालयातच गळफास घेऊन आत्महत्या केली होती. पोलिसांना घटनास्थळी एक सुसाईड नोट सापडली होती. या सुसाईड नोटच्या आधारावर व कुटुंबीयांनी दिलेल्या फिर्यादीवरून वडवमी न्यायालयाचे न्यायाधीश रफीक शेख व इतर एका आरोपीवर वडवणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनायक चंदेल यांचा मुलगा विश्वजीत चंदेल यांच्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली आहे. न्यायाधीश रफीक शेख व एका कर्मचाऱ्याकडून विनायक यांना वारंवार त्रास दिला जात होता. या त्रासाला कंटाळून त्यांनी सत्काराच्या शालीने कोर्टात गळफास लावून आत्महत्या केली, असे यासंबंधीच्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. पीडित कुटुंबीयांनी या प्रकरणी न्यायाचीही मागणी केली आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे लाच घेण्याच्या प्रकरणात न्यायाधीशांवर गुन्हा दाखल होण्याच्या घटना यापूर्वी अनेकदा घडल्यात. पण आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी एखाद्या जजवर गुन्हा दाखल होण्याची ही कदाचित पहिलीच वेळ आहे. काही महिन्यांपूर्वी साताऱ्यातील एका न्यायाधीशावर लाच घेतल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर आता वडवणी येथील न्यायाधीशावर मृत्यूस कारणीभूत असल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामुळे न्यायलयीन वर्तुळात एकच खळबळ माजली आहे. 'एबीपी माझा'च्या वृत्तानुसार, या घटनेनंतर संबंधित न्यायाधीशाने आपल्या पदाचा राजीनामा दिल्याचीही माहिती आहे. पोलिस आता त्यांचा शोध घेत आहेत.

जिल्ह्यातील एका सरकारी वकिलाने कोर्टात केलेल्या आत्महत्येविषयी एक नवी अपडेट समोर आली आहे. या प्रकरणी वडवणी न्यायालयाच्या न्यायाधीशावरच गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे राहण्याचे फर्मान सोडणाऱ्या न्यायाधीशावरच या प्रकरणी आरोपीच्या पिंजऱ्यात उभे राहण्याची वेळ आल्यामुळे राज्याच्या न्याय वर्तुळात एकच खळबळ माजली आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, वडवणी न्यायालयातील सरकारी वकील विनायक चंदेल यांनी दोन दिवसांपूर्वी न्यायालयातच गळफास घेऊन आत्महत्या केली होती. पोलिसांना घटनास्थळी एक सुसाईड नोट सापडली होती. या सुसाईड नोटच्या आधारावर व कुटुंबीयांनी दिलेल्या फिर्यादीवरून वडवमी न्यायालयाचे न्यायाधीश रफीक शेख व इतर एका आरोपीवर वडवणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनायक चंदेल यांचा मुलगा विश्वजीत चंदेल यांच्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली आहे. न्यायाधीश रफीक शेख व एका कर्मचाऱ्याकडून विनायक यांना वारंवार त्रास दिला जात होता. या त्रासाला कंटाळून त्यांनी सत्काराच्या शालीने कोर्टात गळफास लावून आत्महत्या केली, असे यासंबंधीच्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. पीडित कुटुंबीयांनी या प्रकरणी न्यायाचीही मागणी केली आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे लाच घेण्याच्या प्रकरणात न्यायाधीशांवर गुन्हा दाखल होण्याच्या घटना यापूर्वी अनेकदा घडल्यात. पण आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी एखाद्या जजवर गुन्हा दाखल होण्याची ही कदाचित पहिलीच वेळ आहे. काही महिन्यांपूर्वी साताऱ्यातील एका न्यायाधीशावर लाच घेतल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर आता वडवणी येथील न्यायाधीशावर मृत्यूस कारणीभूत असल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामुळे न्यायलयीन वर्तुळात एकच खळबळ माजली आहे. 'एबीपी माझा'च्या वृत्तानुसार, या घटनेनंतर संबंधित न्यायाधीशाने आपल्या पदाचा राजीनामा दिल्याचीही माहिती आहे. पोलिस आता त्यांचा शोध घेत आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २३ ऑगस्ट २०२५


## पोलीस स्टेशन किनगाव राजा येथे शांतता समितीची बैठक-नागरिकांची उत्साह पूर्ण उपस्थिती




**किनगाव राजा (महेश मुंढे)** : आज दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी पोलीस स्टेशन किनगाव राजा तर्फे शांतता समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीस श्रीमती मनीषा कदम उपविभागीय पोलीस अधिकारी देऊळगाव राजा, श्री अजित दिवटे तहसीलदार सिंदखेडराजा, श्री भास्कर घुगे बीडिओ पंचायत समिति सिंदखेड राजा, श्री इरफान अली ज्येष्ठ शांतता समिती सदस्य, श्री सुभाष घिके ज्येष्ठ शांतता समिती सदस्य श्री प्रवीण गिते यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच किनगाव राजा परिसरातील महिला, नागरिक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, तसेच किनगाव राजा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या गावांचे सरपंच,पत्रकार व इतर मान्यवरही मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगामी गणेशोत्सव,मोहरम तसेच इतर सणांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी प्रशासनाकडून नागरिकांना काही सूचना देण्यात आल्या तसेच नागरिकांनीही आप आपल्या समस्या प्रशासनासमोर मांडल्या. अफवांना बळी न पडता परस्परांमध्ये एकोपा राखावा, सामाजिक सलोखा टिकून ठेवावा, तसेच पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन श्रीमती मनीषा कदम उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी उपस्थित नागरिकांना केले. तसेच श्री अजित दिवटे तहसीलदार सिंदखेड राजा यांनीही शांतता राखण्याचे आवाहन केले. श्री संजय मातोंडकर ठाणेदार पोलीस स्टेशन किनगाव राजा यांनीही उत्कृष्ट मार्गदर्शन केले. या बैठकीत तंटामुक्ती अध्यक्ष,सरपंच, महावितरणचे अधिकारी श्री मालवकर व श्री माघडे तसेच परिसरातील सर्व नागरिकांनी व गणेश मंडळाचे अध्यक्ष व इतर यांनी प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या बैठकीमुळे आगामी सण - उत्सव शांततेत आणि उत्साहात साजरे होतील असा विश्वास व्यक्त करण्यात आला. पोलीस स्टेशन किनगाव राजा यांचे तर्फे पोलीस कॉन्स्टेबल श्री परसूवाले यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

## श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन यात्रा अलोट भाविकांच्या उपस्थितीत थाटात संपन्न



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : दि 21- उमरगा तालुक्यातील मुरूम येथे श्रावण मासात ग्रामदैवत श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन यात्रा महोत्सव थाटात संपन्न झाला.प्रतिवर्षा प्रमाणे यात्रेनिमित्र जिल्हा बँकेचे चेअरमन बापूराव पाटील यांच्या मार्गदर्शनार्थ, युवानेते प्रशांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली- शिवमहापुराणाचे आयोजन करण्यात आले होते. पुराण प्रवचक: षष्टस्थल प्रबोधक पूज्य श्री अन्नदानेश्वर स्वामीजी यांच्या मधुरवाणीने संगीतकार :- गानरत्न अशोकय्या हिरेमठ तबलावादक :- अशोक पट्टारा यांच्या संगीत साथीने दि. 28 जुलै ते 20 ऑगस्ट पर्यंत शिवमहापुराण सोहळा पार पडला याप्रसंगी असंख्य महिला भगिनीं, भावीक भक्तांनी पुराणाचे लाभ घेतले. दि. 21 वार गुरुवार रोजी श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन पालखीचे ग्राम भ्रमणानंतर यात्रेचे सांगता संपन्न झाले.दि.20 रोजी रात्री 12 वाजून 10 मिनिटाला अग्नी पेठवण्यात आले, सकाळी अतिशय भक्तिमय वातावरणात विधिवत पूजन संपन्न झाल्यानंतर पालखी पुरंत आणि सदभक्तांच्या उपस्थित अग्नी प्रवेश झाला. प्रारंभी श्री हनुमान चौकातून पालखी ग्राम प्रदक्षिणा साठी सुरुवात झाले. अतिशय भक्तिमय वतातवरणात पुरंत यांचे पारंपारिक खेळी, विविध भजने मंडळे, विविध समाजाचे नंदी कोलचा उत्स्फूर्तपणे सहभाग होता. ग्रामदैवत श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन यात्रा बापूराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दि.21 वार गुरुवार रोजी जल्लोषात संपन्न झाले, सकाळी दहा वाजता श्री. कपिलसिद्ध मल्लिकार्जुन पालखी अग्नी प्रवेश करून नगर प्रदक्षिणास सुरुवात झाली. श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन पालखीत असंख्य भाविक भक्तीत तल्लीन झाले होते. अष्टगी,लोणी, भोसगे परिवाराच्या वतीने प्रतिवर्षी प्रमाणे त्यांच्या घरून वाजत गाजत कुंभ कळस घेऊन आले. प्रारंभी अग्नी प्रवेशा नंतर हुनुमान चौकात श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन यांच्या पालखीचे भक्तिमय वातावरणात व पुरंत खेळून पूजन संपन्न झाले त्यानंतर पालखी नगर प्रदक्षिणा साठी निघाली, यादरम्यान असंख्य महिला भगिनी डोक्यावर कुंभकळस घेऊन ग्रामप्रदक्षिणा मध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला होता. त्याच बरोबर मुरूम शहरातील मातंग,परीट, सुतार समाजाचे मानाचे दिंडीचाही उत्साहात सहभाग झाला होता, शहरातील विविध भजनी मंडळानेही पालखीत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला, शहरातील सोनार गल्ली, अशोक चौक, भाजी मंडई, डोंगरे गल्ली,टिळक चौक, किसान चौक, सुभाष चौक,गांधी चौक या पालखी मार्गावर भाविक भक्तांनी रांगोळीने व त्याच बरोबर पालखी पूजन करून व पालखी वर पुष्पवृष्टी करून ठिकठिकाणी स्वागत केले, डोंगरे परिवाराच्या वतीने भक्तासाठी दुधाचा प्रसादाचे वाटप केले, गांधी चौकात दुर्गे परिवाराच्या वतीने चहा-पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती, मंदिर समितीच्या वतीने प्रदक्षिणा दरम्यान सदभक्तांना अल्पउपहार, पाण्याची सोय करण्यात आली होती. टाळ, मृदंग, ढोल-ताश्यानी भक्तिमय वातावरणात श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन जयघोषाणे मुरूम नगरीतुन पालखी सोहळा हजारो नागरिकांच्या सहभागाने संपन्न झाले. सुभाष चौकातून पालखी गांधी चौकाकडे मार्गस्थ झाले यावेळी धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन बापुराव पाटील यांनी श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन पालखीचे दर्शन घेतले. कपिलेश्वर मंदिर देवस्थानच्या वतीने श्री.कपिलसिद्ध मल्लिकार्जुन यात्रेनिमित्त दरवर्षी पुराणाचे आयोजन केले जाते, पालखी प्रदक्षिणा नंतर यात्रा महोत्सवाचे सांगता संपन्न झाले. अतिशय भक्तिमय वातावरणात श्री.कपिलसिद्ध मल्लिकार्जुन यात्रा उत्साहात संपन्न झाले, यात्रा व संपूर्ण सोहळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मंदिर समिती अध्यक्ष प्रशांत पाटील मित्र मंडळाच्य वतीने परिश्रम घेतले.शरण पाटील फौंडेशनच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. पालखी प्रदक्षिणा नंतर हजारो भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य



Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २३ ऑगस्ट २०२५


## पोळा

गाव हर्षानं सजलं
गल्ली बोळीले उधानं...!
घास पुरण पोळीचा
येशी तोरणाचा मानं..!!

रंग रंगोटी आंगानं
बैलं नटली थाटूनं..!
जशे वर वऱ्हाडीत
दिशे गावात उठुनं..!!

मारुतीच्या येशीवर्हे
करे हलगी आवाजं..!
पळे बैलं दामटतं
वाजे घोगराचा साजं..!!

सर्व्यां घरी गोडधोड
उभे दार पाहे वाट..!
पाणी खुऱ्याले ओतूनं
फिरे बैलावर्हे ताट..!!

**कवी माणिक सोनवणे**
**सोयगांव.**
**फो.नं.9022240311**


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


# मनसेचे मुंबईतील खड्ड्यांविरोधात आंदोलन



**मुंबई** : मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात पावसामुळे रस्त्यांची मोठी दुर्दशा झाली आहे. एका बाजूला खड्ड्यांमुळे टोल आकारला जाऊ शकत नाही, असे सांगून सर्वोच्च न्यायालयाने सरकारला फटकारले आहे. तर दुसरीकडे, या मुद्द्यावर आंदोलन करणाऱ्यांना उद्देशून मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी 'त्यांच्याकडे कोणतेही काम राहिलेले नाही' असे वक्तव्य केले आहे. मुंबई महानगरपालिकेने रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम सुरू केले असून गणपतीपूर्वी हे काम पूर्ण होईल, असे आश्वासनही लोढा यांनी दिले आहे.

मंगलप्रभात लोढा म्हणाले की, जे लोक खड्ड्यांवरून आंदोलन करतात. त्यांच्याकडे कोणतही काम राहिलेले नाही. मग करायचे काय म्हणून ते आंदोलन करत आहेत. जिथे पंचवर्क निघाले असेल तिथे देखील दुरुस्ती केली जाईल. गणपतीपूर्वी सगळे खड्डे बुजवले जातील, असे लोढा यांनी म्हटले आहे.

मुंबईतील रस्त्यांवरील खड्ड्यांविरोधात मनसे पुन्हा एकदा आक्रमक झाली आहे. आज, मनसेने चांदिवली येथील एनएसएस रोडवर खड्ड्यांमध्ये उभे राहून आंदोलन केले. यावेळी, खड्ड्यांमुळे जखमी झालेल्या नागरिकांचे प्रतीकात्मक प्रतिनिधित्व करण्यासाठी काही जखमी कार्यकर्त्यांना खड्ड्यात उभे करण्यात आले होते. मनसे कार्यकर्त्यांनी पालिका प्रशासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. मनसेचे विभाग अध्यक्ष महेंद्र भानुशाली यांनी यापुढे जिथे जिथे खड्डे असतील, तिथे तिथे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

मनसे प्रमुख राज ठाकरे रस्त्यांच्या दुर्दशेवर टीका करताना म्हणाले, रस्ते बांधकामाचे टेंडर काढा, रस्ता बनवा, तो खराब झाला की पुन्हा टेंडर काढा, हा नवा धंदा सुरू झाला आहे. शिवतीर्थवर गुरुवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी रस्त्यांवरून जोरदार टीका केली. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत मुंबई शहर नियोजनाचा लघुआराखडा सादर करत चर्चा केली. गेल्या काही महिन्यांपासून ते मुख्यमंत्र्यांशी शहर नियोजनासह विविध विषयांवर संवाद साधत आहेत. मुसळधार पावसामुळे पाणी साचणे, रस्त्यांवरील खड्डे, वाहतुकीतील अडचणी, अनधिकृत पार्किंग यांसारखे गंभीर मुद्दे असले तरी, या भेटीत वाहतुकीसंदर्भात विशेष चर्चा झाली. प्रेझेंटेशनवेळी वाहतुकीसंदर्भातील पोलिस आयुक्तही उपस्थित होते.

# ओबीसीत २९ नव्या जातींचा समावेश करण्याच्या हालचाली




**मुंबई** : राज्याच्या इतर मागासवर्ग (ओबीसी) जातींच्या यादीत आता २९ नव्या जातींचा समावेश करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. यासंदर्भात राज्य मागासवर्ग आयोगाने राज्य सरकारला शिफारशींचा प्रस्ताव पाठवला आहे. राज्य सरकारची मंजुरी मिळाल्यानंतर हा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी केंद्र सरकारकडे पाठवण्यात येणार आहे.

महाराष्ट्रात इतर मागासवर्गीयांची यादी खूप मोठी आहे. यामध्ये सुमारे ३५१ मूळ जाती आणि त्यांच्या असंख्य उपजातींचा समावेश आहे. याशिवाय, विमुक्त जाती, भटक्या जाती, जमाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग अशा विविध जाती समूहांचाही यात समावेश होतो. या सर्व जातींच्या उपजातींना राज्याच्या यादीत स्थान देण्यात आले असून, त्यांना निश्चित आरक्षणही मिळते.

राज्यात सध्या ओबीसी वर्गात माळी, कुणबी, धनगर, वंजारी, तेली, तसेच विमुक्त जाती आणि भटक्या जमाती यांचा समावेश होतो. इतर मागासवर्ग समाजातील अनेक गट त्यांच्या जातीचा ओबीसी यादीत समावेश करण्यासाठी प्रस्ताव देतात. या प्रस्तावांनुसार, मागासवर्ग आयोगाकडून संबंधित जाती समूहांबाबतचे पुरावे आणि कागदपत्रांची छाननी केली जाते.

कागदपत्रांची पडताळणी करून खात्री झाल्यावर, आयोगाने ओबीसी यादीत २९ नव्या जातींचा समावेश करण्याची शिफारस सरकारकडे केली आहे. ओबीसी जातींची यादी तयार करण्याचे अधिकार राज्य सरकारला आहेत. यासंदर्भात राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्याकडून प्रतिसाद मिळू शकला नाही.

लोध, लोधा, लोधी, बडगुजर, पेंढारी, वीरशैव लिंगायत, लिंगायत गुरव; तसेच लिंगायतमधील जंगम, न्हावी, तेली, माळी, धोबी, फुलारी, सुतारी आदी उपजातींच्या समावेशाची शिफारस केली आहे. पोवार, भोयर, पवार, गुजर, रेवा गुजर, सूर्यवंशी गुजर, बेलदार, सलमानी, किराड, डांगरी, कलवार, कुलवंत वाणी, वाणी (कुलवंत), कुमावत, नेवेवाणी, वरठी, परीट, धोबी, पटवा, सपलिग, सपलिगा, निषाद, मल्लाह, कुंजडा, दोरी, ईस्ट इंडियन, ईस्ट इंडियन ख्रिश्चन, शेगर, कानोडी, गवलान या जातींचा समावेश करण्याची शिफारस मागासवर्ग आयोगाकडून करण्यात आली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २३ ऑगस्ट २०२५


## ठाकरे बंधू एकत्र आले तरी फरक पडणार नाही - संजय निरुपम



**मुंबई :** सत्तेसाठी बाळासाहेबांचे विचार सोडणारे आणि वारंवार भूमिका बदलणारे ठाकरे बंधू एकत्र आले तरी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत फारसा फरक पडणार नाही हे बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीतून दिसून आले, अशी टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेचे उपनेते तथा प्रवक्ते संजय निरुपम यांनी शुक्रवारी केली.

मुंबईतील बेस्ट पतपेढीची नुकतीच निवडणूक झाली. त्यात ठाकरे बंधूंच्या पॅनलचा दारूण पराभव झाला. संजय निरुपम यांनी शुक्रवारी या प्रकरणी येथे आयोजित एका पत्रकार परिषदेत ठाकरे बंधूंवर निशाणा साधला. तसेच त्यांच्या आघाडीमुळे मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत काहीही फरक पडणार नसल्याचा दावा केला. ठाकरे बंधु एकत्र आल्याने मुंबईचे राजकारण बदलेल असे केले जाणारे दावे या निकालाने फोल ठरले, असा टोला निरुपम यांनी यावेळी लगावला. मराठी माणसांच्या मनात बाळासाहेब ठाकरेंनंतर आता एकनाथ शिंदे यांना स्थान आहे, असे ते म्हणाले.

निरुपम पुढे म्हणाले की, बेस्ट पतपेढी निवडणुकीपूर्वी मुंबईत उबाठा आणि मनसेची युती करण्यात आली होती. मराठी मतांसाठी त्यांनी मराठी विरुद्ध हिंदी असा वाद निर्माण केला गेला. ठाकरे बंधू एकत्र आल्याने मुंबईचे राजकारण बदलेल. तसेच ठाकरे ब्रँडबाबत विजयाचे दावे केले जात होते, मात्र हे दावे बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीत फोल ठरले. पतपेढीच्या निवडणुकीत २१ जागांपैकी एकही जागा ठाकरे बंधुंना जिंकता आले नाही. या निवडणुकीत ८३ टक्के मतदान झाले. बेस्टच्या १२ हजार मतदारांनी ठाकरे बंधूंना नाकारले, असे निरुपम म्हणाले.

मुंबईत एकच ब्रँड तो म्हणजे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हे आहेत. बाळासाहेबांनंतर मुंबईतील मराठी माणसांच्या मनात शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्थान आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांचे खरे वारसदार एकनाथ शिंदे आहेत, असे निरुपम म्हणाले. मुंबई सर्वांना सामावून घेणारं शहर आहे. या शहरात भाषिक वाद करण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्यांना स्पष्टपणे नाकारले जाईल, असे बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीतून संदेश मिळाला आहे. मुंबईत उबाठाचे आमदार आणि खासदार हे मुस्लिम मतांवर निवडून आले. त्यांच्यापासून मराठी मतदार दुरावला आहे, असे ते म्हणाले.

## मतदार यादीत घोळ असल्याचे फडणवीस यांनी मान्य केले - जयंत पाटील यांचा पलटवार



**मुंबई :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या कुटुंबीयांचे ३ ठिकाणी मतदान यादीत नावे असल्याचा गंभीर आरोप भाजपच्या एका पदाधिकाऱ्याने केला आहे. यावरुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खरे व्होट चोर कोण? असा प्रश्न विरोधकांना विचारला आहे. मात्र, एकाच व्यक्तीचे ३ ठिकाणी मतदान यादीत नावे आहेत, म्हणजेच देवेंद्र फडणवीस यांनी मत चोरीचा आरोप मान्य केला असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी केला आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या कुटुंबीयांचे ३ ठिकाणी मतदान यादीत नावे असल्याचा गंभीर आरोप भाजपच्या एका पदाधिकाऱ्याने केला आहे. कथित व्होट चोरीच्या मुद्यावरून काँग्रेसने देशभरात भाजप विरोधात रान पेटवले असताना पृथ्वीराज चव्हाण यांच्यावर हा आरोप झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील या प्रकरणी काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याकडून स्पष्टीकरण मागितले आहे. अतुल भोसलेंनी केलेल्या आरोपांमुळे खरे व्होट चोर कोण? हे समोर आले असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच याचे उत्तर राहुल गांधी यांनी दिले पाहिजे, अशी मागणी देखील त्यांनी केली. यावरुन आता जयंत पाटील यांनी पलटवार केला आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या कुटुंबीयांचे ३ ठिकाणी मतदान असल्याचा गंभीर आरोप भाजपच्या एका पदाधिकाऱ्याने केला आहे. कथित व्होट चोरीच्या मुद्यावरून काँग्रेसने देशभरात भाजप विरोधात रान पेटवले असताना पृथ्वीराज चव्हाण यांच्यावर हा आरोप झाला आहे. भाजप आमदार अतुल भोसले यांच्या समर्थकांनी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या कुटुंबातील सदस्यांचे एकाहून अधिक ठिकाणी मतदान असल्याचा आरोप केला आहे. पृथ्वीराज चव्हाण यांचे पुतणे इंद्रजीत चव्हाण यांचे ३ ठिकाणी मतदान आहे. एवढेच नाही तर इंद्रजीत चव्हाण यांच्या पत्नी, आई व मुलगा यांचेही मतदार यादीत ३ वेळा नाव आहे. पृथ्वीराज चव्हाण यांचे अन्य एक पुतणे राहुल यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांचेही ३ ठिकाणी मतदान आहे. विशेष म्हणजे या सर्वांनी वय बदलून नाव नोंदणी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याकडून स्पष्टीकरण मागितले आहे. अतुल भोसलेंनी केलेल्या आरोपामुळे खरे व्होट चोर कोण आहेत हे समोर आले आहे. याचे उत्तर राहुल गांधी यांनी दिले पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला अॅडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी
B.A.(मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २३ ऑगस्ट २०२५

## पुण्यात कोयता गँगनंतर आता 'मास्क मॅन'ची दहशत



**पुणे** : पुण्यातील गुन्हेगारी दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसत आहे. कुठे कोयता गँग तर कुठे ड्रिंक अँड ड्राइव्ह, अशा अनेक घटनांनी पुण्याचे नाव काहीसे खराबच होत चालले आहे. त्यात आणखी भर पडली असून आता पिंपरी चिंचवड भागात 'मास्क मॅन'ने दहशत पसरवली आहे.

पिंपरी चिंचवड भागात एका मास्क मॅनने दहशत पसरवली आहे. हा व्यक्ती मास्क घालून दिवसाढवळ्या हातात चाकू घेऊन फिरताना दिसला. यामुळे या भागातील लोकांमध्ये भीती निर्माण झाली आहे. निगडी येथील बजाज ऑटोमोबाइल समोर असलेल्या पेट्रोल पंप परिसरात हा मास्क मॅन दिसला. यावेळी त्याच्या हातात धारदार चाकू होता. हा चाकू कोणाला मारण्यासाठी होता की लोकांमध्ये दहशत निर्माण करण्यासाठी होता, हे अद्याप स्पष्ट झाले नाही.

मास्क घालून अशा प्रकारे लोकांच्या मनात दहशत पसरवणे अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे. या मास्क मॅनला लवकरात लवकर ताब्यात घेण्याची मागणी स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांनी पोलिस प्रशासनाकडे केली आहे. पिंपरी चिंचवड शहरात वावरणाऱ्या मास्क मॅनला पोलिस कधी अटक करणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, यापूर्वी काही महिन्यांपूर्वी पुण्यात कोयता गँगचे चांगलीच दहशत माजवली होती. ही टोली हातात कोयता घेत भर दिवसा दुकानदारांवर तसेच कोणावरही वार करत सुटत होते. मे महिन्यात काही तरुणांचा वाद झाला व या वादाचे रूपांतर नंतर मोठ्या राड्यात झाले. यावेळी त्यांनी कोयता काढून एकमेकांवर सपासप वार करत जीवघेणा हल्ला केला होता. या प्रकरणी चौघांना अटक करण्यात आली होती. आता पिंपरी चिंचवड येथे मास्क मॅनची दहशत पसरली आहे. यावर कधी कारवाई होणार, याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंनी केली नुकसानग्रस्त भागाची पाहणी



**हिंगोली** : हिंगोलीतील कळमनुरी तालुक्यामधील गंगापूर येथील पूरग्रस्त भागाची विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंनी आज शुक्रवार 22 ऑगस्ट रोजी पाहणी केली. शेतकऱ्यांच्या हळद, केळी, सोयाबीन आणि ऊस पिकाचे सरसकट नुकसान झाले असून शासन आणि प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी दानवे यांनी यावेळी केली.पिक विम्याचे तीन निकष शासनाने रद्द केल्याने विमा अंतर्गत या नुकसानीची भरपाई मिळणार नाही. शेतकऱ्यांचे पिक शिल्लक राहिले नाही. बैलपोळा हा सण शेतकऱ्यांचा उत्सवाचा आणि आनंदाचा क्षण असतो. मात्र शेतकरी राजाचे पिक वाया गेल्याने शेतकऱ्यांच्या आनंदावर विर्जन पडले आहे. शासनाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई घोषित करून शेतकऱ्यांचा बैलपोळा सणाचा आनंद गोड करावा, असे आवाहन अंबादास दानवे यांनी केली.शासनाने नुकसान झालेल्या भागाचा अभ्यास करावा. शेतकऱ्यांचे पिक शिल्लक राहिले नाही. शेतकऱ्यांवर या अतिवृष्टीमुळे मोठे अस्मानी संकट आले असल्याने संपूर्ण उत्पन्नच मातीत गेले आहे. यामुळे शेतकरी घेतलेले कर्ज फेडणार कसे? असा प्रश्न उपस्थित करत शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी झाली पाहिजे,अशी मागणी दानवे यांनी केली.हिंगोली जिल्ह्यातील गंगापूर येथे पुरात अडकल्या 8 लोकांची अंबादास दानवे यांनी यावेळी भेट घेतली. या पुरात 4 दिवस हे नागरिक अडकले होते. वेळेवर आम्हाला रेस्क्यू आणि बचाव पथक पोहचले नाही. यामुळे 4 दिवस आम्ही अन्न पाण्याविना राहिलो असल्याची तक्रार या नागरिकांनी केली. प्रशासनाला संबंधित प्रकरणाचा जाब विचारत आगामी काळात अशी हलगर्जीपणा होता कामा नये, अशी सूचना अंबादास दानवे यांनी केली.

## कात्रज घाटात प्रेमप्रकरणातून तरुणाचा खून : प्रेयसीच्या मानलेल्या भावाला संपवले




**पुणे** : अल्पवयीन मुलाने साथीदारांच्या मदतीने निर्घृण खून केल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी ग्रामीण पोलीस दलाच्या राजगड पोलिसांकडून तीन जणांना अटक करण्यात आली आहे.तर तीन अल्पवयीनांना ताब्यात घेण्यात आले आहे. जुन्या कात्रज बोगद्याजवळील डोंगरावर कात्रजमधील तरुणाचा खून करण्यात आला होता. या प्रकरणाचा राजगड पोलिसांनी तपास करुन गुन्ह्याचा तपास लावला आहे.

सौरभ स्वामी आठवले (वय 25, रा. पंचरत्न सोसायटी, मांगडेवाडी, कात्रज) असे खुन झालेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी श्रीमंत अनिल गुज्जे (वय 21, रा. खंडोबा मंदिराजवळ, वडगाव मावळ), संगम नामदेव क्षीरसागर (वय 19, रा. वडगाव मावळ), नितीन त्र्यंबक शिंदे (वय 18, रा. गोकुळनगर, कात्रज, मूळ रा. खुठे गाव, ता. औसा, जि. लातूर) यांना अटक करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुन्या कात्रज बोगद्याजवळ डोंगरावर एका तरुणाचा मृतदेह पडल्याची माहिती तेथे फिरायला गेलेल्या नागरिकांनी पोलिसांना दिली. त्यानंतर राजगड पोलिसांचे पथक तेथे पोहोचले. पोलिसांनी चौकशी करुन मृतदेहाची ओळख पटवली. तेव्हा मृतदेह सौरभ आठवले याचा असल्याची माहिती मिळाली. सौरभ 18 ऑगस्ट रोजी घरातून बेपत्ता झाल्याची तक्रार नातेवाईकांनी राजगड पोलिसांकडे दिली होती. पोलिसांनी सौरभचे मित्र, नातेवाईकांकडे चौकशी केली. तेव्हा खुनामागचे निश्चित कारण समजू शकले नव्हते. तांत्रिक तपासात सौरभचा खून अल्पवयीनांनी केल्याची माहिती पोलीस कर्मचारी नलावडे यांना मिळाली. आरोपी कात्रज घाट परिसरातील गोगलवाडी येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून तिघांना ताब्यात घेतले.

मांगडेवाडी परिसरात अल्पवयीन त्याच्या आत्याकडे राहत होता. त्याचे एका मुलीशी प्रेमसंबंध होते. सौरभ याच परिसरात राहत होता. तो मुलीला बहीण मानायचा. तो तिला दररोज शाळेत सोडायचा. त्याने मुलीच्या प्रेमप्रकरणाची माहिती आई-वडिलांना दिली.

त्यानंतर अल्पवयीन मुलगा आत्याचे घर सोडून वडगाव मावळ येथे राहायला गेला. सौरभमुळे प्रेमसंबंधात अडथळे आल्याने अल्पवयीन चिडला होता. त्याने साथीदारांच्या मदतीने सौरभच्या खुनाचा कट रचला. त्यानंतर सौरभला त्यांनी कात्रज बोगद्याजवळ भेटण्यास बोलवले. सौरभला डोंगरावर नेऊन आरोपींनी त्याच्यावर कोयत्याने वार केले. पोलीस तपासात ही माहिती मिळाल्यानंतर आरोपींना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून तीन मोबाइल संच आणि दोन दुचाकी जप्त करण्यात आल्या. अटक करण्यात आलेल्या तीन आरोपींना पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहे.

ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, अतिरिक्त अधीक्षक गणेश बिराजदार, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह गौर यांच्या मार्गदर्शनाखाली राजगड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेश गवळी, सहायक पोलीस निरीक्षक तुकाराम राठोड, उपनिरीक्षक अजित पाटील, वृषाली देसाई यांनी ही कामगिरी केली.